**-: प्रेसनोट दिनांक - २४/०६/२०१९ :-**

**आरोपी लोकसेवक अजीज रमजान शेख, वय-५२, पो.हे.कॉ. ब.नं. १०६८, लक्ष्मीपूरी पोलीस ठाणे, कोल्हापूर वर्ग-३ यांनी खाजगी इसम नामे दाऊद बाबालाल पाटणकर, वय-४३ यांचे मार्फत २५०००/- रुपये लाच रक्कम स्विकारलेने त्यांना रंगेहात पकडलेबाबत.**

---

तक्रारदार यांनी माहे डिसेंबर-२०१७ मध्ये टाईम्स ऑफ इंडिया वृत्तपत्रातील सौभाग्य फायनान्स कंपनी प्लॅट खरेदी विक्रीकरीता कर्ज देणेची जाहिरात पाहुन, संबंधीत कंपीनचे श्री.गोरख शर्मा यांचेशी संपर्क साधुन त्यांचा नियोजित प्रकल्पाचा अहवाल ई-मेलवर पाठविला होता. त्यावर त्यांनी तक्रारदार यांना साधारण ८ कोटी ४० लाख कर्ज मंजुरीचे पत्र पाठविले होते. त्यावेळी त्यांनी तक्रारदार यांचेकडून वेळोवेळी प्रकल्पाचे विविध चार्जेसाठी म्हणुन २२,३७,९८०/- रूपये भरून घेतले होते. परंतु त्यानंतरही तक्रारदार यांचे कर्ज मंजुर झाले नाही व त्यांनी कर्ज मंजुरीबाबत टाळाटाळ करू लागल्यावर तक्रारदार यांची फसवणुक झालेचे निष्पन्न झालेने तक्रारदार यांनी लक्ष्मीपुरी पोलीस ठाणेस दिनांक १०/०८/२०१८ रोजी रितसर तक्रार देवून फसवणुकीबाबत गुन्हा नोंद केला आहे. त्या गुन्हयाचा तपास पोलीस उप निरीक्षक पवार लक्ष्मीपुरी पोलीस ठाणे यांचेकडे आहे. तक्रारदार यांनी दाखल केलेल्या गुन्हयातील आरोपी हे बाहेरील राज्यातील असलेने त्यांचा शोध घेवून त्यांना अटक करणेस लक्ष्मीपूरी पोलीस ठाणेचे पोलीस टाळाटाळ करीत होते.

आज दिनांक २४/०६/२०१९ रोजी सकाळी लक्ष्मीपूरी पोलीस ठाणेचे पोलीस उप निरीक्षक पोवार यांनी तक्रारदार यांना निरोप देवून भेटणेस लक्ष्मीपूरी पोलीस ठाणेस बोलविले होते. त्याप्रमाणे तक्रारदार हे आज सकाळी पोलीस उपनिरीक्षक पवार यांना भेटण्यासाठी गेले. परंतू ते भेटले नाहीत. तेथील पोलीस शेख यांनी तक्रारदार यांची भेट घेवून त्यांनी दाखल केलेल्या गुन्हयातील आरोपी दिल्ली येथे असून तेथे जावून त्यांचा शोध घेवुन त्यांना अटक करणेसाठी खर्च होणार आहे. आम्ही तपास पथकासह दिल्ली येथे जाणार आहोत. त्या खर्चाकरीता तुम्हाला २५,०००/- रूपये द्यावे लागतील असे सांगून तक्रारदार यांच्याकडे २५,०००/- रुपये लाचेची मागणी केली. त्याबाबत तक्रारदार यांनी लक्ष्मीपूरी पोलीस ठाणेचे पोलीस शेख यांचेविरुध्द आज दिनांक २४/०६/२०१९ रोजी अँन्टी करप्शन ब्युरो कोल्हापूर कार्यालयाकडे तक्रारी अर्ज दिला.

तक्रारदार यांचे तक्रारीप्रमाणे आज दिनांक २४/०६/२०१९ रोजी शासकीय पंच साक्षीदार यांचे समक्ष लाचेच्या मागणीची पडताळणी केली असता, पडताळणी मध्ये लक्ष्मीपूरी पोलीस ठाणेचे पोलीस शेख यांनी तक्रारदार यांचेकडे त्यांनी दाखल केलेल्या गुन्हयातील आरोपींना तपास पथकासह दिल्ली येथे जावून आरोपींना घेवून येणेसाठी २५,०००/- रूपये लाचेची मागणी करुन ती लाच रक्कम खाजगी इसम नामे दाऊद बाबालाल पाटणकर यांचेकडे देण्यास सांगितले. तसेच खाजगी इसम दाऊद पाटणकर यांनी देखील पोलीस शेख यांचेकरीता २५०००/- रुपये लाचेची मागणी करुन ती लाच रक्कम पोलीस ठाणेच्या जवळ पद्मा टॉकीज चौकात असलेल्या चहाच्या गाडीजवळ घेवून येण्यास सांगितलेचे पडताळणी मध्ये निष्पन्न झाले.

त्याप्रमाणे आज दिनांक २४/०६/२०१९ रोजी लक्ष्मीपूरी पोलीस ठाणेचे पोलीस शेख व खाजगी इसम नामे दाऊद पाटणकर यांचेविरुध्द लक्ष्मीपूरी पोलीस ठाणेच्या जवळ पद्मा टॉकीज चौकात सापळयाचे आयोजन केले असता, खाजगी इसम दाऊद पाटणकर यांनी लक्ष्मीपूर पोलीस ठाणेचे पोलीस शेख यांचेकरीता तक्रारदार यांचेकडे २५०००/- रुपये लाचेची मागणी करुन ती लाच रक्कम स्विकारली असता त्यांना रंगेहात पकडणेत आले. तसेच पोलीस शेख यांना लक्ष्मीपूरी पोलीस ठाणेतून ताब्यात घेण्यात आले असून त्यांच्याविरुध्द लक्ष्मीपूरी पोलीस ठाणे, जि.कोल्हापूर येथे गुन्हा नोंद करणेची प्रक्रिया सुरु आहे.

सदरची कारवाई श्री.संदिप दिवाण पोलीस उपआयुक्त/पोलीस अधीक्षक, अँन्टी करप्शन ब्युरो, पुणे व श्रीमती सुषमा चव्हाण, अपर पोलीस उप आयुक्त/अपर पोलीस अधीक्षक, अँन्टी करप्शन ब्युरो, पुणे यांचे मार्गदर्शना नुसार, श्री.आदिनाथ बुधवंत, पोलीस उप अधीक्षक, श्री.जितेंद्र पाटील, पोलीस निरीक्षक, सफौ.शाम बुचडे, पोना. शरद पोरे व पोहेकॉ. मोहन सौंदत्ती, पोकॉ. कृष्णात पाटील, मयुर देसाई, रुपेश माने, चालक पोहेकॉ. विष्णू गुरव, अँन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर यांनी केली आहे.

**सर्व नागरिकांना आवाहन करणेत येते की, लाचेच्या अथवा अपसंपदेबाबत तकारी असल्यास लाच लुचपत प्रतिबंधक विभागाच्या खालील कंमाकावर संपर्क साधावा.**

**१) मा.महासंचालक, लाच लुचपत प्रतिबंधक विभाग,म.रा.मुंबई टोल फ्री कमांक :- १८००२२२०२१**
**२) मा.पोलीस अधीक्षक, लाच लुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे परिक्षेत्र, पुणे**
**दुरध्वनी कमांक :- ०२०/२६१२२१३४, ०२०/२६१३२८०२, ०२०/२६०५०४२३**
**३) श्री.आदिनाथ बुधवंत , पोलीस उपअधीक्षक, लाच लुचपत प्रतिबंधक विभाग, कोल्हापूर ७०८३६६८३३३. ०२३१/२५४०९८९.**
**४) हेल्पलाईन टोल फ्री कमांक :- १०६४.**
**५) व्हॉटस अप कमांक :- ७८७५३३३३३३**